सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग

# संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचे कार्यालय

(स्थित-चंद्रपूर ) आकाशवाणी जवळ, बंगला नं. २८, चंद्रपूर-४४२४०१ ( महाराष्ट्र )
दूरध्वनी क्र.- ०७१७२ २७२९९९ E-mail :- directorbrtc@mahaforest.gov.in

BRTC

जावक क्रमांक कक्ष- वपअ/BRTC/261/2023-24 दिनांक:- 17/10/2023

## जाहिरात
## 15 दिवसीय बांबू बांधकाम प्रशिक्षण

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली अंतर्गत **"15 दिवसीय निवासी बांबू बांधकाम प्रशिक्षण"** साठी बांबू बांधकाम क्षेत्रातील विविध बांबू कारागिरांकडून व आवड असलेल्या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| प्रशिक्षणाचे नाव | कालावधी | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| "बांबू बांधकाम प्रशिक्षण" | 15 दिवस<br>(21 नोव्हेंबर ते 05 डिसेंबर 2023) | 20 |

- **पात्रता** -: इयता 10 वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण
- **बांबू बांधकाम क्षेत्राचा आवड व बांबू क्षेत्रातील अनुभव**
- प्रवेश अर्ज करणे -: दि. 18/10/2023 पासून सुरु
- अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख. -: दि 17/11/2023 साय.5.30 वाजेपर्यंत, उमेदवारास अर्ज पोस्टाने किंवा स्वतः कार्यालयात येऊन सादर करता येईल. (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून-आवश्यक कागदपत्रांसह)

**सूचना /अटी व शर्ती :-** 1) उमेदवाराचे वय 18 वर्ष पूर्ण असावे व तो महाराष्ट्रातील रहिवासी असावा. 2) उमेदवाराने शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी दस्ताऐवज अर्जासोबत जोडण्यात यावे. अर्जाचा नमुना या कार्यालयाच्या www.brtc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून तो संकेतस्थळावरून डाऊनलोड करावा. 3) विहित केलेल्या कालावधीत अर्ज प्राप्त न झाल्यास उमेदवाराचा प्रशिक्षणासाठी विचार करण्यात येणार नाही. 4) उमेदवाराची निवड करताना त्यांची बांबू बांधकाम क्षेत्रातील आवड व त्यांचा कल व अनुभव यास प्राधान्य देण्यात येईल, त्याबाबतचे सक्षम दस्ताऐवज अर्जसोबत जोडण्यात यावे. 5) प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांची कौशल्य क्षमता चाचणी दि. 21/11/2023 रोजी BRTC कार्यशाळा, वनअकादमी परिसर मूल रोड चंद्रपूर येथे आयोजित करण्यात येईल यात पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येईल. 6) BRTC अंतर्गत बांबू बांधकाम प्रशिक्षणाचा यापूर्वी लाभ घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्याला या प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार नाही. 7) प्रशिक्षणाअंतर्गत उमेदवार निवड प्रक्रिया, कालावधी प्रशिक्षणासंबंधी सर्व अधिकार संचालक BRTC यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. अधिकच्या माहितीसाठी खालील कार्यालयीन पत्यावर संपर्क करावा.

**कार्यालयाचा पत्ता :-**

संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (स्थित-चंद्रपूर)
बंगला नं 28, सिव्हील लाईन, आकाशवाणीजवळ, चंद्रपूर-442401,
दूरध्वनी क्र. 9158508275, 8208177912
संकेतस्थळ:- www.brtc.org.in